**विशेष दरखास्त क्र. १/२०२२ मध्ये निशाणी क्र.३७ कडील अर्जावर आदेश.**

१) प्रस्तुतचा अर्ज न्यायनिर्णीत धनको यांनी दरखास्तीची रक्कम रुपये २०,९९,०००/– इतक्या रक्कमेच्या वसुलीकरीता न्यायनिर्णित ऋणकोविरुद्ध जंगम मालमत्ता जप्ती होऊन विक्री होण्याकरीता वॉरंट काढण्याबाबत दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जात असे कथन केले आहे की, मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी सदर दरखास्तीच्या अंमलबजावणीस स्थगीती दिली होती. परंतु मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी दिनांक २२/०२/२०२४ रोजी स्थगिती आदेश व्हॅकेट केला आहे. न्यायनिर्णीत ऋणकोकडून रुपये २०,९९,०००/– इतकी रक्कम येणे बाकी आहे.

२) प्रस्तुत अर्जास म्हणणे देण्याबाबत न्यायनिर्णीत ऋणको यांना आदेशीत केले आहे. परंतु न्यानिर्णीत ऋणको यांनी या अर्जास म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज न्यायनिर्णित ऋणकोच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्याबाबत प्रस्तुत अर्जावर आदेश पारीत केला आहे.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी न्यायनिर्णीत धनको यांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या युक्तिवादाकामी न्यायनिर्णीत ऋणकोला व त्यांच्या विद्वान वकीलांना दुपारी १२.५० वाजेपर्यंत पुकारले असता गैरहजर असल्याने प्रस्तुत अर्जावर न्यायनिर्णीत ऋणकोतर्फे युक्तिवाद नाही असा आदेश पारीत केला आहे. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) न्यायनिर्णीत धनको यांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला

असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, न्यायनिर्णीत धनको यांनी प्रस्तुतची दरखास्त एच.एम.पी. क्र. २९/२०१९ या प्रकरणातील निशाणी क्र. १४ कडील अर्जावर पारीत केलेल्या आदेशानुसारची अंतरीम पोटगीची रक्कम वसुल होऊन मिळण्याकरीता दाख केली आहे. मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी रिट पिटीशन क्र. १२०६२/२०२२ मधील दिनांक १७/१०/२०२२ रोजीच्या आदेशानुसार प्रस्तुत दरखास्तीच्या पुढील कामकाजास स्थगीती दिली होती. त्यानुसार प्रस्तुत दरखास्तीचे कामकाज स्थगित होते. परंतु त्यानंतर मा. मुंबई उच्च न्यायालयाकडून प्रस्तुत प्रकरणात रिट प्राप्त झाली आहे व त्या रिटसोबत रिट पिटीशन क्र. १२०६२/२०२२ या प्रकरणातील दिनांक २२/०२/२०२४ व दिनांक ०४/०३/२०२४ रोजीच्या आदेशांची प्रत प्राप्त झाली आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र. १२०६२/२०२२ या प्रकरणातील दिनांक ०४/०३/२०२४ रोजीच्या आदेशानुसार प्रस्तुत प्रकरणास दिलेला अंतरीम स्थगिती आदेश व्हॅकेट केला आहे. मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी प्रस्तुत प्रकरणास दिलेला अंतरीम स्थगिती आदेश व्हॅकेट केल्यानंतर न्यायनिर्णित ऋणको यांनी त्यांच्याकडे देय असलेली दरखास्तीची रक्कम न्यायालयात जमा केली नाही अथवा धनको यांना अदा केली नाही. त्यामुळे वरील वरील नमुद कारणांमुळे माझ्या मते न्यायनिर्णित धनको यांनी न्यायनिर्णित ऋणकोविरुद्ध जंगम मालमत्तेची जप्ती करण्यासाठी वॉरंट काढण्याबाबत केलेली विनंती मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) न्यायनिर्णीत धनको यांच्या विनंतीप्रमाणे न्यायानिर्णीत ऋणकोविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २१, नियम ४३ मधील तरतुदीनुसार जंगम मालमत्तेची जप्ती करण्यासाठीचे वॉरंट काढण्यात यावे.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.08.22 16:25:06 +0530

दिनांकः–२२/०८/२०२४ (पां. लिं. घुले)

ठिकाणः– कराड २रे सह दि.न्या. व. स्तर, कराड.